जा.क्र.माध्य-३/प्रथम मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १. यांचे कार्यालय,
दिनांक :- 22 AUG 2000

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे.

विषय :- प्रथम मान्यता
आदर्श माध्यमिक विद्यामंदिर, दळवीनगर

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/६-४/प्र.मा/९९-२००० दिनांक ७.२.२०००

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३ अन्वये आदर्श सार्वजनिक विश्वस्त संस्था, दळवीनगर संस्थेच्या आदर्श माध्यमिक विद्यालय दळवीनगर, कुंभारी माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/~~९ वी~~ ~~१० वी~~ च्या वर्गास १९९९-२००० या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे यांची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केल्या आहेत किंवा कसे या बाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३] शिक्षक पालक संघाची स्थापना करावी.
१४]
१५]

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १.

प्रत- मुख्याध्यापक आदर्श विद्यामंदिर [माध्यमिक] दळवीनगर

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा/
२०००-२००१
पुणे. दि. १५/७/००.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

आदर्श माध्यमिक विद्यालय, कवडेनगर मुंढवा
पुणे ३६.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन २००० -२००१

आदर्श माध्य. विद्यालय, कवडेनगर ता. जि. पुणे.
इ. ६वी, इ. ७वी, इ. ९वी, इ. १०वी.

आपल्या आदर्श सार्वजनिक विश्वस्त, मुंढवा या संस्थे-द्वारा संचलित आदर्श माध्य. विद्यालय, कवडेनगर मुंढवा ह्या माध्य. शाळेत इ. ८वी/इ. ५वी या वर्ग [मराठी/इंग्रजी] सुरू करणेस सन ९९-२००० या. शै. वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/३१/९३/नमाशा/(पुवि)/१५३३४/९९ दि. २९/१२/९९ अन्वये शासन परवानगी मिळालेली आहे. सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, इ. ७वी, इ. ९वी, इ. १०वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू होत आहे. सदर वर्गास जून २००० पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. सदर वर्गाच्या वार्षिक तपासणीबाबत आपण संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती —— जि. पुणे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करून घेऊन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वीचा नैसर्गिक वाढीने सुरू आहेत अशा माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी आवश्यकती सर्व कागदपत्रे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

J.N.H.
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा/
२००१-२००२
पुणे. दि. २८/५/२००१

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

आदर्श माध्यमिक विद्यालय, कवडेनगर-मुंढवा
पुणे ३६.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन २००१ -२००२.

आदर्श माध्य. विद्यालय, कवडेनगर मुंढवा. जि. पुणे.
इ. ~~६वी, इ. ७वी, इ. ९वी~~, इ. १०वी.

आपल्या आदर्श सार्वजनिक शिक्षण संस्था या संस्थे-व्दारा संचलित आदर्श माध्य. विद्यालय कवडेनगर-मुंढवा ह्या माध्य. शाळेत इ. ८वी/~~इ. ५वी~~ या वर्ग [मराठी/~~इंग्रजी~~] सुरु करणेस सन ९९-२०००. या शै. वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/३/९३/नमाशा/मान्यता/पुवि/५५३३४/९९ दि.२९/१२/९९ अन्वये शासन परवानगी मिळालेली आहे. सन २००१ -२००२ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी~~, ~~इ. ७वी, इ. ९वी~~, इ. १०वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००१ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. सदर वर्गाच्या वार्षिक तपासणीबाबत आपण संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे/~~गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ —— जि. पुणे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेऊन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वीचे नैसर्गिक वाढीने सुरु आहेत अशा माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी आवश्यकती सर्व कागदपत्रा जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

J.N.H.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

**वाचा** - १) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील निर्णय क्रमांक माशातु-२०१२/(९०/१२) / माशि-१ दिनांक १६ ऑगस्ट २०१२.

२) शासन निर्णय क्र.माशातु-२०१०/(४२०/१०) /माशि-१ दिनांक १४/६/२०१०.

३) मा.शिक्षण संचालक माध्य.व उच्च माध्य.शिक्षण संचालनाय पुणे यांचेकडील पत्र क्र.अमाशा/२०१२-१३/अतिरिक्त तुकडया/१५ क(०६)/ ८०८५ दिनांक २१/८/२०१२.

४) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.शिउसं/माध्य-३/१३/२२०७५/७९/ अतिरिक्त तुकडया/पुवि/१२ दिनांक ५/९/२०१२.

५) आपलेकडील सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ चे पटपडताळणी अहवाल तसेच सदर वर्षाचे अतिरिक्त तुकडी मागणी प्रस्ताव.

६) कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक १०/०९/२०१२.

**पुणे जिल्हा परिषद पुणे.**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**जा.क्र.जिप/माध्य/अतितु/शिबीर/१२**
**पुणे दिनांक २७ /०९/२०१२.**

## विना अनुदान तुकडी मंजुरी आदेश –

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडयांना **सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर** मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर यादीनुसार आपल्या शाळेस खालील अटीस अधीन राहुन शहरी व ग्रामीण विभागातील शाळांतील **अतिरिक्त तुकडयांस शैक्षणीक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.**

| अ.नं | शाळेचे नाव | इयत्तानिहाय तुकडयांची संख्या | | | | | | एकूण तुकडया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | |
| | | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | |
| १ | आदर्श माध्यमिक विद्यालय, दळवीनगर, मुंढवा पुणे ३६ | ------ | ------ | ------ | ------ | ------ | १ | १ |
| | | ------- | ------ | ------- | ------ | ------ | २ री | |

१) इ.५ वी ते ८ वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

२) इ.९ वी व १० वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना शाळेमध्ये माध्यमिक शाळा संहिता कलम ८.३ (एक) नुसार भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३) प्रत्यक्षात निकषानुसार आवश्यक विदयार्थी पटसंख्या कमी आढळल्यास सदरचे तुकडी मंजूरीचे आदेश आपोआप रद्द होतील.

४) सदरच्या मंजूर केलेल्या तुकडयांना भविष्यात लागू होणा-या अनुदान सूत्रानुसार किंवा सदयस्थितीत लागू असलेल्या दिनांक १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या वर्षी मूल्यांकनात पात्र ठरतील त्या वर्षापासून म्हणजेच पाचव्या वर्षी २० टक्के, त्यापुढील वर्षी अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के या प्रमाणात सदर तुकडया अनुदानास पात्र होतील. अनुदानास तुकडी पात्र झाली म्हणजे त्या तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित तुकडयांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र तुकडयांना अनुदान लागू करेल.

28/9/2012

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रति,
मुख्याध्यापक संबंधित शाळा आदर्श माध्यमिक विद्यालय, दळवीनगर, मुंढवा पुणे ३६
२/- सदर आदेशानुसार आपण सन २०१२-१३ ची सेवकसंच निश्चिती करुन घ्यावी.

**प्रत माहितीसाठी सादर** –

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-०१.

२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१

३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-०१.

आदेश

यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे जिल्हा परिषद,पुणे
शिक्षण विभाग माध्यमिक,
जा.क्र.शिक्षण/माध्य/अति.तुकडी/अति.शिक्षक/३७०९-३२२८
दिनांक :२६/३ /२००८

**विषय : समायोजनाने तुकडी मान्यता व अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी समायोजन.**

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. माशातु–२००६/(१६१/०६)/माशि १ दि.१२.६.२००७
२. मा.शिक्षण संचालक, म.रा.,पुणे १ यांचे दि.८.१२.१९९४ चे परिपत्रक
३. मा.शिक्षण संचालक, म.रा.,पुणे १ यांचे अमाशा–३०९५/१५क दि.२४.७.१९९५

सन २००७–०८ या शैक्षणिक वर्षात करण्यात आलेल्या पटपडताळणीमध्ये म.जो.फुले, आदमबाग, पुणे या विद्यालयातील इ. ९ वी ची तुकडी कमी झाली आहे.

सदर कमी झालेली तुकडी गुणवत्तेनुसार आदर्श माध्य. विद्यालय, दळवीनगर, मुंढवा (इ. ९ वी २ री ) या विद्यालयास संदर्भ १ वरील तरतुदीनुसार पुढील अटींच्या अधीन राहून समायोजनाने मंजूर करण्यात येत आहे.

१. सदरहू तुकडी १००% अनुदानावर मंजूर करण्यात येत आहे.
२. सदर तुकडीचे समायोजन अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यासह करण्यात येत आहे. अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतराचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.
३. सदर अतिरिक्त कर्मचाऱ्याचे समायोजन न केल्यास आपल्या विद्यालयास मंजूर झालेली तुकडी संदर्भ २ मधील तरतुदीनुसार आपोआप रद्द होईल.
४. समायोजन करण्यात आलेले अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी ज्या शाळेत समायोजन करण्यात आले आहे त्या ठिकाणी त्वरीत हजर न झाल्यास त्यांची सेवा म.खा.शा.क. ( सेवाशर्ती ) नियमावली १९८१ मधील तरतूदीनुसार आपोआप संपुष्टात येईल.
५. सदर समायोजन संबंधित कर्मचाऱ्याच्या वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण देउन करण्यात येत आहे.
६. समायोजन करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता म.खा.शा.क.नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार नियमित होईल.
७. ज्या शिक्षकांची मूळ नियुक्ती प्रशिक्षित पदवीधर पदावर असूनही त्यांचे समायोजन तात्पुरत्या स्वरूपात अपदवीधर पदावर करण्यात आले आहे त्यांची वेतनश्रेणी व वेतन यांना कोणतीही बाधा येणार नाही. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदवीधर पदावर त्यांचे समायोजन यथानियम करण्यात यावे.

| क्र. | अतिरिक्त कर्मचाऱ्याचे नाव व सध्याची शाळा | हुद्दा | शै.पात्रता | वेतनश्रेणी | समायोजन केलेली शाळा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.रामटेके ए.डी.<br>श्री.गोपाळ हायस्कूल, पुणे | उपशिक्षक | एम.ए.<br>बी.पी.एड. | ५५००–९००० | आदर्श माध्य. विद्यालय, दळवीनगर, मुंढवा |

उपरोक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यास त्वरित हजर करून घ्यावे व तसा अहवाल दि.२२.४.०८ रोजी सेंट हिल्डाज हायस्कूल, गुरूवार पेठ, पंचहौद, पुणे येथे स. ११ ते ३ या वेळेत सादर करावा. त्याचवेळी सुधारीत सेवकसंच मंजूरी प्रस्ताव आणून तो मंजूर करून घ्यावा.

**शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे**

प्रत कार्यवाहीसाठी
१. अधिक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक,पुणे
२. मुख्याध्यापक, श्री.गोपाळ हायस्कूल, पुणे
संबंधित शिक्षकास समायोजन केलेल्या शाळेवर रूजू होणेकरीता तात्काळ मुक्त करावे.
३. मुख्याध्यापक, आदर्श माध्य. विद्यालय, दळवीनगर, मुंढवा
संबंधित शिक्षकास हजर करून घेउंन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
४. श्री./श्रीम. रामटेके ए.डी.
यांस संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांचे मार्फत रवाना
२. त्यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वरील क्र.४ वरील सूचनेचे पालन करावयाचे आहे.